# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग, एलफिन्स्टन, मुंबई – ४०० ०१३.

## विषय: सेवानिवृत्त शासकीय स्थापत्य अभियंता कंत्राटी पद्धतीवर नेमणूक करणेबाबत

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण–२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.८ जानेवारी २०१६, तसेच दि.२ मार्च, २०१६ अनुसार महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळास सेवानिवृत्त शासकीय स्थापत्य अभियंत्याची कंत्राटी पद्धतीने नेमणूक करावयाची आहे. शासनाच्या वर्ग–२ च्या दर्जापेक्षा कमी नसलेल्या सेवानिवृत्त शासकीय स्थापत्य अभियंत्यांनी आपले अर्ज सोबतच्या नमुन्यामध्ये उपरोक्त पत्त्यावर जाहिरातीच्या दिनांकापासून **१० दिवसांच्या आत** सादर करावेत.

**नियुक्तीकरिता खालील अटी लक्षात घ्याव्यात –**

- **स्थापत्य अभियंता (कंत्राटी)** पदासाठी अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यास केंद्र किंवा राज्य शासनाच्या किंवा शासकीय उपक्रम किंवा मंडळ/महामंडळाच्या बांधकाम विभागात वर्ग–२ च्या दर्जापेक्षा कमी नसलेल्या पदावर कमीत कमी ३ वर्षे कामाचा अनुभव असावा.
- सदर नेमणूक एक वर्षासाठी करार पद्धतीने करण्यात येईल. संबंधिताची सेवा कधीही संपुष्टात आणण्याचा अधिकार मंडळास राहील.
- सदर पदावर नेमणूक झाल्यास मंडळाच्या मालकीच्या, शासनाकडून हस्तांतरित झालेल्या व भाडेत्त्वावरील इमारतींची देखभाल व दुरुस्ती करणे, दुरावस्थेत असलेल्या इमारतींची पाहणी करून सूचीनुसार अंदाजपत्रक तयार करणे, निविदा तयार करणे, ठेकेदाराची नेमणूक करणे, ठेकेदाराची बिले तपासणे, दुरुस्तीचे मोजमाप घेणे, दुरुस्ती कामावर देखरेख ठेवणे, तसेच कामगार कल्याण केंद्रांसाठी बांधण्यात येत असलेल्या इमारतींचे शासकीय नियमाप्रमाणे विविध सक्षम अधिकाऱ्यांची मान्यता मिळविणे, वास्तुशास्त्रज्ञाची नेमणूक करणे, वास्तुशास्त्रज्ञामार्फत आराखडे तयार करणे इत्यादी.
- आवश्यकतेनुसार वेळोवेळी महाराष्ट्र राज्यात प्रवास करावा लागेल. त्यासाठी आवश्यक प्रवास खर्च दिला जाईल.
- करार पद्धतीवर नेमणुकीकरिता अर्ज करतेवेळी सेवानिवृत्त शासकीय स्थापत्य अभियंता यांचे वय ७० वर्षांपेक्षा अधिक नसावे.
- करार पद्धतीने नियुक्ती करण्यात आल्यामुळे संबंधितांस शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/सामावून घेण्याबाबत वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा हक्क नसेल.
- नियुक्ती कालावधीत करार पद्धतीने नेमून दिलेली कामे पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल.
- करार पद्धतीवरील स्थापत्य अभियंता (कंत्राटी) यांनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधार सामग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.
- सेवानिवृत्त शासकीय अधिकारी यांच्या विहित कार्यपद्धतीचे पालन करून करार पद्धतीने नेमणूक करताना त्यांना सेवानिवृत्तीपूर्वी असलेल्या एकूण वेतनात (मूळ वेतन व महागाई भत्ता धरून) त्यांना आता मिळत असलेले एकूण निवृत्ती वेतन (महागाई भत्ता व अंशराशीकृत निवृत्ती वेतनासह) वजा केल्यानंतर होणारी रक्कम त्यांचे मासिक परिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल. तथापी सदर परिश्रमिक रक्कम रु.४०,००० प्रतिमाहपेक्षा अधिक असणार नाही.
- करार पद्धतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या स्थापत्य अभियंता (कंत्राटी) यांस सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण–२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.८ जानेवारी २०१६, तसेच दि.२ मार्च, २०१६ मधील अटी व शर्ती लागू राहतील.
- पात्र अर्जांची संख्या विचारात घेऊन योग्य निवड पद्धतीचा अवलंब करण्यात येईल.

सही/–
**कल्याण आयुक्त**

## अर्जाचा नमुना

उमेदवाराचे अलीकडील स्वत:चे रंगीत छायाचित्र येथे चिकटवावे.

### अर्ज केलेल्या पदाचे नाव – स्थापत्य अभियंता (कंत्राटी)

अर्जदाराचे नाव – ...........................................

अर्जदाराचा पत्ता – ...........................................

भ्रमणध्वनी क्रमांक – ...........................................

जन्मदिनांक व वय – ...........................................

शिक्षण – ...........................................

अनुभव – ...........................................

उपरोक्त पदावर कंत्राटी पद्धतीने नेमणुकीबाबत जाहिरात/सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून सदर सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण –
दिनांक –

अर्जदाराची स्वाक्षरी